**सर्वसाधारण सूचना :- कँटर**

१. पेंच व्याघ्र प्रकल्पा अंतर्गत पुर्व पेंच वन परिक्षेत्रातील अमलतास, सिल्लारी आणि पश्चिम पेंच वनपरिक्षेत्रातील कोलितमारा येथे अनुक्रमे ०२ आणि ०१ शासकीय पर्यटन वाहन (कँटर) पर्यटकाना सफारी करीता उपलब्ध करुन देण्यात येतील.

२. सदर कँटर पर्यटकाना संदर्भित ठिकाणी वनपरिक्षेत्र अधिकारी, पुर्व पेंच, पिपरीया आणि वनपरिक्षेत्र अधिकारी, पश्चिम पेंच, घाटपेंढरी यांचे कार्यालयात रितसर अर्ज करून संपूर्ण शुल्क भरून आरक्षित करता येतील.

३. वनपरिक्षेत्र अधिकारी, पुर्व पेंच, पिपरीया आणि वनपरिक्षेत्र अधिकारी, पश्चिम पेंच, घाटपेंढरी हे उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपुर कार्यालयाकडून परवानगी घेऊनच प्राप्त अर्जानुसार शासकीय पर्यटन वाहन (कँटर) आरक्षित करतील.

४. अर्ज सादर करताना पर्यटक आपले नाव, संपूर्ण पत्ता, सहभागी सर्व व्यक्तींची नावे, ओळखपत्र (आधार) याची माहिती सादर करतील. यामध्ये सफारी वेळी कोणताही बदल केला जाणार नाही.

५. कँटर आरक्षित केल्यानंतर पर्यटक सफारी साठी न आल्यास कोणत्याही परिस्थितीत शुल्क परत केले जाणार नाही.

६. एका कँटर मध्ये जास्तीत जास्त १८ व्यक्तींचे आरक्षण करू शकतात. पर्यटकांचा ग्रुप असल्यास उदा. शाळा/ महाविद्यालयचे विद्यार्थी याना प्राधान्य राहील.

७. आगाऊ आरक्षण १८ पेक्षा कमी पर्यटकांचे असल्यास त्याना सर्व १८ जागेचे शुल्क एकत्रितरित्या भरावे लागेल.

८. प्रत्यक्ष सफारी दिवशी अनारक्षित कँटर पर्यटकाना सफारी करीता बुकिंग काउंटर वरून मिळू शकतो (ऑन स्पॉट बुकिंग) यामध्ये किमान ०७ पर्यटक असणे गरजेचे आहे. ऑन स्पॉट बुकिंग द्वारे सोडण्यात येणारा पहिला कँटर सफारी वेळेच्या सुरुवातीच्या वेळेच्या अर्धा तास उशिराने आणि दूसरा कँटर पहिल्या कँटरच्या अर्ध्या तासानंतर सोडण्यात येईल.

९. सफारी वेळी एका कँटर साठी किमान ०२ निसर्ग मार्गदर्शक उपस्थित राहतील. (०९ पेक्षा कमी पर्यटक असल्यास ०१ निसर्ग मार्गदर्शक उपस्थित राहील)

१०. कँटर चे शुल्क: (सोमवार ते शुक्रवार: प्रति व्यक्ति ₹ ५००/- ; शनिवार आणि रविवार : प्रति व्यक्ति ₹ ६५०/-)

११. वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालयाकडून आगाऊ आरक्षण आणि ऑन स्पॉट बुकिंग द्वारे सोडलेल्या कँटर बाबत चा मासिक अहवाल उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर कार्यालयास दर महिन्याचा ०५ तारखेपर्यंत सादर करणे बंधनकारक राहील.

**सर्वसाधारण सूचना - Nature Trail**

१. गाईड सोबत जीपीएस, स्मार्ट स्टिक, आवश्यक राहील

२. मोबाईल आणि इतर साधने "Flight Mode" मध्ये ठेवणे अनिवार्य आहे.

३. कॅमेरा करिता अतिरिक्त शुल्क राहणार नाही.

४. कमीत कमी ०२ पर्यटक असणे आवश्यक आहे.

५. ०२ ते ०६ पर्यटकांसाठी ०१ गाईड नेमण्यात येईल.

६. एका वेळेस थोड्या कालावधी मध्ये ०६ पर्यटकांचे ०३ ग्रुप्स पाठवण्यात येतील.

७. ट्रेल चे आरक्षण हे सिल्लारी / सुरेवाणी (व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्रामध्ये) येथील सफारी आरक्षण कक्षातुन होईल.

८. एका ग्रुपसाठी ट्रेल शुल्क : ₹१,०००/(गाईड- ₹४००/-, वन विभाग- ₹६००/-)

९. पर्यटकांना QR कोड द्वारे ट्रेलसाठी हजर राहण्याचे ठिकाण समजेल.

१०. पर्यटकांनी ट्रेल साठी जाताना भडक रंगाचे कपडे घालू नयेत.

११. पर्यटकांना संमतिपत्र/हमी पत्र देणे बंधनकारक राहील. भ्रमंती वेळी जोखीम ही पर्यटकाची राहील.

१२. पर्यटकांना फक्त फळे, ज्युस, पाणी इत्यादी नेण्याची अनुमती राहील.

१३. पर्यटकांकडून गैरवर्तन झाल्यास पर्यटक (वन्यजीव संरक्षण १९७२ कायदयातील तरतुदीनुसार) दंडास पात्र राहतील.

१४. अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांना राहील.

**<u>सर्वसाधारण सूचना - Cycle Trail</u>**

१. गाईड सोबत जीपीएस व प्रथमोपचार पेटी आवश्यक राहील

२. मोबाईल आणि इतर साधने "Flight Mode" मध्ये ठेवणे अनिवार्य आहे.

३. कॅमेरा करिता अतिरिक्त शुल्क राहणार नाही.

४. कमीत कमी ०२ पर्यटक असणे आवश्यक आहे.

५. ०२ ते ०६ पर्यटकांसाठी ०१ गाईड नेमण्यात येईल.

६. ट्रेल चे आरक्षण हे सिल्लारी / सुरेवाणी येथील सफारी आरक्षण कक्षातुन होईल व ट्रेलची सुरुवात सुध्दा तेथुनच होईल.

७. गाईड व सायकलसाठी खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

गाईड :- ₹५००/-

सायकल :- ₹१५०/- प्रति सायकल

८. सायकल ट्रेल ची सुरुवात सकाळी ०६.०० पासुन होईल.

९. पर्यटकांनी ट्रेल साठी जाताना भडक रंगाचे कपडे घालू नयेत.

१०. पर्यटकांना संमतिपत्र/हमी पत्र देणे बंधनकारक राहील. भ्रमंती वेळी जोखीम ही पर्यटकाची राहील.

११. भ्रमंती दरम्यान सायकलचे नुकसान झाल्यास पर्यटकांना भरपाई देणे आवश्यक आहे. (रू.५००/- अनामत रक्कम भरणा करावी लागेल)

१२. पर्यटकांना फक्त फळे, ज्युस, पाणी इत्यादी नेण्याची अनुमती राहील.

१३. पर्यटकांकडून गैरवर्तन झाल्यास पर्यटक (वन्यजीव संरक्षण १९७२ कायदयातील तरतुदीनुसार) दंडास पात्र राहतील.

१४. अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांना राहील.